POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२५ ● मुंबई, गुरुवार, १९ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA




## राज्यातील शिक्षण व्यवस्थेची लक्तरे वेशीवर

### सहावीच्या विद्यार्थ्यांकडून दहावीचे पेपर तपासले, 268 शिक्षकांनी दिव्यांग, घटस्फोटीत असल्याचं सांगत बदली करुन घेतली

**शिक्षण व्यवस्थेवर प्रश्न**

एकीकडे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणारे प्रकार, तर दुसरीकडे शिक्षकांकडूनच नियमांचा गैरवापर होत असल्याने सातारा ते अकोल्यातील शिक्षणातील घोटाळ्यांमुळे शिक्षण व्यवस्थेचे नुकसान होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील शिक्षण क्षेत्रात दोन धक्कादायक प्रकार समोर आले असून शिक्षण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सातारा येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचे पेपर सहावीच्या विद्यार्थ्यांकडून तपासून घेतल्याचा प्रकार उघड झाला आहे, तर अकोला येथे शिक्षक बदली प्रक्रियेत मोठा घोटाळा समोर आला आहे.

**सहावीच्या विद्यार्थ्यांकडून दहावीचे पेपर तपासले :** साताऱ्यातील फलटण तालुक्यातील विडणी येथील उत्तरेश्वर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये हा प्रकार घडल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात सहावीच्या विद्यार्थ्यांकडून दहावीचे पेपर तपासून घेतले जात असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला, ज्यामुळे शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता आणि विश्वासार्हता यावर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या वेळी संबंधित शिक्षकांचे नाव वैभव शेंडे असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचवेळी असा कोणताही प्रकार झाला नसल्याचा दावा शाळेने केला.

**तक्रारदारालाच नोटीस :** हा प्रकार उघड करणाऱ्या तक्रारदारालाच संस्थेकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याने वाद अधिकच वाढला आहे. विशेष म्हणजे, पेपर तपासणारा शिक्षक आणि तक्रार करणारा व्यक्ती या दोघांनाही समान नोटीस देण्यात आली, अशी माहिती समोर आली आहे.

**268 शिक्षकांनी बोगस प्रमाणपत्रे वापरली :** दुसरीकडे अकोला जिल्हा परिषद शिक्षण विभागात आंतरजिल्हा शिक्षक बदली प्रक्रियेत मोठा घोटाळा उघड झाला आहे. बदलीत फायदा मिळवण्यासाठी 268 शिक्षकांनी दिव्यांग, परित्यक्त आणि अंतराच्या नावाखाली बोगस प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. काही शिक्षकांनी स्वतःला दिव्यांग दाखवले, तर काहींनी खोटा घटस्फोट दाखवून लाभ मिळवण्याचा प्रयत्न केला, अशी माहिती चौकशीत समोर आली आहे.

**अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई :** या प्रकरणात प्रभारी गट शिक्षणाधिकारी दिनेश दुतोंडे यांच्यासह चार जणांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच सुमारे 300 जणांवर कारवाईची टांगती तलवार असल्याचे सांगितले जात आहे.

**चौकशीत गंभीर त्रुटी :** तक्रारीनंतर झालेल्या त्रिस्तरीय चौकशीत अनेक अहवाल त्रुटीपूर्ण आढळले असून, अपात्र शिक्षकांना बदलीचा लाभ मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे शिक्षण विभागाच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## पश्चिम रेल्वेच्या प्रवाशांना दिलासा

### गुढीपाडव्यापासून १५ डब्यांच्या लोकल वाढणार, १६ उपनगरीय सेवांचे होणार रूपांतर



**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईकरांच्या दैनंदिन प्रवासात दिलासा देण्यासाठी पश्चिम रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. उपनगरीय लोकलमधील वाढती गर्दी कमी करण्यासाठी १९ मार्चपासून १२ डब्यांच्या १६ उपनगरीय सेवांचे १५ डब्यांच्या लोकलमध्ये रूपांतर करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे हा बदल गुढीपाडव्याच्या दिवशीच लागू होणार आहे.

या निर्णयानंतर पश्चिम रेल्वेवरील १५ डब्यांच्या लोकल सेवांची संख्या २११ वरून २२७ पर्यंत वाढणार आहे. मात्र, एकूण उपनगरीय फेऱ्यांची संख्या १,४१४ इतकीच कायम राहणार आहे.

**गर्दीच्या वेळेत ८ लोकल सेवा**

१५ डब्यांमध्ये रूपांतरित होणाऱ्या १६ सेवांपैकी ८ सेवा पीक अवरमध्ये चालवण्यात येणार आहेत. यामध्ये ४ सेवा सकाळच्या गर्दीच्या वेळेत तर ४ सेवा संध्याकाळच्या गर्दीच्या वेळेत चालवण्यात येतील. त्यामुळे कार्यालयीन वेळेतील प्रचंड गर्दी काही प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

**मुंबईची लाइफलाइन अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न**

मुंबईची उपनगरीय रेल्वे ही शहराची लाइफलाइन मानली जाते. दररोज लाखो प्रवासी या सेवांवर अवलंबून असतात. त्यामुळे अधिक १५ डब्यांच्या लोकल सुरू झाल्यास विशेषतः गर्दीच्या वेळेत प्रवास काहीसा सुसह्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**प्रवाशांची वहनक्षमता सुमारे २० टक्क्यांनी वाढणार**

रेल्वे अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या बदलामुळे प्रवाशांची वहनक्षमता सुमारे २० टक्क्यांनी वाढणार असून चर्चगेट-विरार-डहाणू रोड या अतिगर्दीच्या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. मुंबईतील उपनगरी रेल्वे मार्गांमध्ये हा कॉरिडॉर सर्वाधिक व्यस्त मानला जातो. त्यामुळे १५ डब्यांच्या लोकल वाढवण्याचा निर्णय प्रवाशांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

**गर्दी कमी करण्यासाठी पश्चिम रेल्वेचे पाऊल**

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी सांगितले की, वाढती प्रवासी संख्या लक्षात घेऊन गर्दी कमी करणे आणि प्रवाशांची सोय सुधारणे हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश आहे. पश्चिम रेल्वेकडून सध्या क्षमता वाढ आणि पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण यावर भर दिला जात असून, वाढत्या प्रवासी ताणाचा सामना करण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे.

## मध्य रेल्वे २०१२ उन्हाळी विशेष रेल्वे सेवा चालवणार

### अतिरिक्त १२० विशेष गाड्या चालविण्याचे नियोजन



**■मुंबई। प्रतिनिधी,**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेने मुंबई, पुणे, सोलापूर, नाशिक रोड आणि नागपूर येथून विविध ठिकाणापर्यंत २०१२ उन्हाळी विशेष गाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. याव्यतिरिक्त आणखी १२० विशेष गाड्या मागणीनुसार चालवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी काही गाड्यांचे आरक्षण आजपासून सुरू झाले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस – मडगाव – छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडीच्या १८ सेवा चालविण्यात येतील. ट्रेन क्रमांक ०११७१ ही साप्ताहिक विशेष गाडी १६ एप्रिल ते ११ जून या कालावधीत सीएसएमटी येथून दर गुरुवारी रात्री १२.२० वाजता सुटेल आणि मडगाव येथे दुपारी ३.१५ वाजता पोहोचेल. या गाडीच्या ९ सेवा तर ट्रेन क्रमांक ०११७२ ही साप्ताहिक विशेष गाडी १६ एप्रिल ते ११ जून या कालावधीत मडगाव येथून दर गुरुवारी सायंकाळी ४ वाजता सुटेल आणि सीएसएमटी येथे पहाटे ३.४५ वाजता पोहोचेल. या गाडीच्या ९ सेवा चालविण्यात येतील.

लोटिट – मडगाव – लोटिट साप्ताहिक उन्हाळी विशेष गाड्याच्या १८ सेवा चालविण्यात येतील. १७ एप्रिल ते १२ जून या कलावधीत या गाड्या चालविण्यात येतील. अशा विविध सेवा चालविण्यात येणार आहेत. ३ एप्रिल ते १६ एप्रिल या कालावधीत १४ सेवा 'मागणीनुसार विशेष गाड्या' म्हणून, आणि १७ एप्रिल ते २ मे या कालावधीत १६ सेवा 'उन्हाळी विशेष गाड्या' म्हणून चालवण्यात येतील.

## पोलीस भरतीसाठी आलेल्या मुलांची सरकारविरोधात घोषणाबाजी

### मरोळ पोलीस कॅम्पबाहेर मोठा गोंधळ




**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या अंधेरी पूर्व भागातील मरोळ कॅम्पमध्ये सुरू असलेल्या पोलीस भरतीदरम्यान मोठा गोंधळ उडाला. पोलीस भरतीसाठी आलेल्या मुलांनी रस्त्यावर उतरून सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. पोलीस भरतीचा मंगळवारचा शेवटचा दिवस असल्याने मुलांना मैदानी चाचणीसाठी आत न घेतल्यामुळे वातावरण चिघळले होते. अखेर आंदोलनाचा मार्ग निवडल्यानंतर मुलांना मैदानी चाचणीसाठी आत घेण्यात आले.

गेल्या दोन दिवसांपासून ही मुले भरतीसाठी आलेली असताना कॅम्पबाहेर रस्त्यावर उभी होती. संतापाचा कडेलोट झाल्यानंतर अखेर त्यांना आंदोलनाचा मार्ग निवडावा लागला. त्यानंतर मुलांना कॅम्पमध्ये घेण्यात आले व मैदान चाचणी घेतली गेली.

मरोळ पोलीस कॅम्पमधील मुख्य रस्त्याचे काम सुरू असल्यामुळे तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. यामुळे रस्त्यावर झालेल्या गर्दीमुळे परिसरातील सोसायट्यांचे प्रवेशद्वारही बंद झाले आहेत. या परिस्थितीमुळे स्थानिक रहिवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असून, पोलिसांच्या ढिसाळ नियोजनामुळेच हा सर्व गोंधळ निर्माण झाल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिली आहे.

मुंबई पोलीस शिपाई भरती प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशी मैदानी चाचणीसाठी काही उमेदवारांना ई–मेलद्वारे चाचणीसाठी बोलावण्यात आले होते, तर काहींना कोणताही अधिकृत संपर्क करण्यात आला नसल्याचे समोर आल्याने संतापलेल्या तरुणांनी थेट रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. सकाळपासून प्रवेश न मिळाल्याने उमेदवारांमध्ये मोठा रोष होता, ज्यामुळे मरोळ–मरोशी रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे रोखला गेला आणि परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**पोलिसांचा अतिरिक्त बंदोबस्त**

वाढता गोंधळ आणि आंदोलनाची तीव्रता पाहता पोलिसांनी तातडीने घटनास्थळी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला. त्यानंतर रस्त्यावर ठिय्या मांडलेल्या सर्व आंदोलनकर्त्या उमेदवारांना समजूत काढून मैदानी चाचणीसाठी कॅम्पच्या आत प्रवेश देण्यात आला. या कारवाईनंतर मरोळ–मरोशी रस्त्यावरील वाहतूक पुन्हा पूर्ववत झाली असून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून खबरदारी घेतली जात आहे.

## दादरमधील व्यक्तीला फोनवरुन घातला 1.05 कोटींचा गंडा!

### तुमच्यासोबतही असं होऊ शकतं... नक्की घडलं काय एकदा वाचाच




**'डिजिटल अरेस्ट'चा वापर करून दबाव**

या प्रकरणात फसवणूक करणाऱ्यांनी ह्यडिजिटल अटकह्न ही संकल्पना वापरली. पीडित व्यक्तीला 10 दिवस सतत संपर्कात ठेवण्यात आले आणि त्यांना बाहेर कुणाशीही संपर्क न करण्यास सांगितले गेले. व्हिडिओ कॉल, सततच्या सूचना आणि खोट्या कागदपत्रांच्या माध्यमातून त्यांच्यावर मानसिक दबाव आणला गेला. या काळात पीडिताला विविध खात्यांमध्ये पैसे ट्रान्सफर करण्यास सांगण्यात आले. सरकारी चौकशी सुरू असल्याचे सांगून त्यांनी प्रत्येक व्यवहार योग्य असल्याचा विश्वास दिला. हळूहळू एकूण 1.05 कोटी रुपये वेगवेगळ्या खात्यांमध्ये वळवले गेले.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत 'डिजिटल अरेस्ट' नावाच्या नव्या प्रकारच्या सायबर फसवणुकीने पुन्हा एकदा धक्कादायक घटना घडली आहे. दादर परिसरातील 71 वर्षीय निवृत्त अधिकाऱ्याला बनावट सरकारी अधिकाऱ्यांच्या जाळ्यात अडकवून तब्बल 1.05 कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली. फोनवरून सुरू झालेला हा प्रकार हळूहळू भीती, दबाव आणि विश्वास यांच्या मिश्रणातून मोठ्या आर्थिक नुकसानीपर्यंत पोहोचला. या घटनेमुळे शहरातील नागरिकांमध्ये पुन्हा एकदा सतर्कतेची गरज अधोरेखित झाली आहे.

**फोन कॉलपासून फसवणुकीची सुरुवात**

पोलिसांच्या माहितीनुसार, 4 मार्च रोजी पीडित व्यक्तीला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्याने स्वतःला 'TRAI' अधिकारी असल्याचे सांगितले. त्याने असा दावा केला की, पीडिताच्या आधार तपशिलावर एक मोबाईल नंबर नोंदवला गेला आहे आणि त्याचा वापर बेकायदेशीर कामांसाठी होत आहे. ही माहिती ऐकून पीडित व्यक्ती घाबरली आणि पुढील सूचनांचे पालन करू लागली. यानंतर हा कॉल दुसऱ्या व्यक्तीकडे वळवण्यात आला, ज्याने स्वतःला 'CBI' अधिकारी असल्याचे सांगितले. त्या व्यक्तीने पीडिताला मनी लॉंड्रिंग प्रकरणात अडकवण्याची धमकी दिली. या संवादात 'तुम्हाला अटक केली जाईल' असे स्पष्टपणे सांगून भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले.

**पोलिसांची कारवाई आणि इशारा**

घटना उघडकीस आल्यानंतर मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. सायबर गुन्हे शाखा आरोपींचा माग काढण्याचा प्रयत्न करत आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये बहुतेक वेळा आंतरराष्ट्रीय टोळ्यांचा सहभाग असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पोलिसांनी नागरिकांना स्पष्ट इशारा दिला आहे की, कोणताही सरकारी अधिकारी फोनवरून अटक किंवा चौकशी करत नाही. अशा कॉल्स आल्यास त्वरित स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा. वैयक्तिक माहिती किंवा बँक तपशील कोणालाही देऊ नयेत, असेही सांगण्यात आले आहे.

## नवी मुंबईत अनैतिक मानवी तस्करीचे रॅकेट उघड

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने तळोजा परिसरात कारवाई करत एका आंतरराष्ट्रीय देहविक्री रॅकेटचा पदार्फाश केला आहे. बांगलादेशातून कामाचे आमिष दाखवून आणलेल्या तरुणींना जबरदस्तीने वेश्याव्यवसायात ढकलणाऱ्या टोळीचा शोध आता पोलिसांनी युद्धपातळीवर सुरू केला आहे. या प्रकरणात एका बांगलादेशी नागरिकाला अटक करण्यात आली असून दोन पीडित तरुणींची सुटका करण्यात आली आहे.




तळोजा परिसरातील घोटगाव येथे काही बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्यास असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याच्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे व त्यांच्या पथकाने १५ मार्च रोजी अचानक छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी नोयोन टोकीबोर शेख ऊर्फ आर्यन याला ताब्यात घेतले. त्याच्यासोबत दोन पीडित तरुणीही आढळल्या. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या दोन्ही तरुणींची कसून चौकशी केली असता, या प्रकरणातील धक्कादायक वास्तव समोर आले.

यातील दोन्ही पीडित तरुणी आणि मुख्य आरोपी हे सर्वजण मूळचे बांगलादेशी आहेत. यातील लोया ऊर्फ स्वाती, तिचा पती सलमान या आरोपी दांपत्याने त्यातील एका तरुणीला चांगले काम मिळवून देण्याचे आमिष दाखवून बांगलादेशात भारतात आणले होते. मात्र, भारतात आल्यानंतर तिला धमकावून आणि जबरदस्तीने वेश्याव्यवसायात जुंपले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपी दाम्पत्याने या तरुणींना केवळ नवी मुंबईतच नव्हे, तर सातारा, लोणावळा, नाशिक, जालना आणि अहमदाबाद यांसारख्या शहरांत ग्राहकांकडे वेश्यागमनाकडे पाठविल्याचे तसेच या व्यवसायातून मिळणारा सर्व पैसा आरोपींनी स्वतः हडप केल्याचे तपासात आढळून आले आहे.

## बीड महिला अत्याचारप्रकरणाची मुंबईतून दखल

### पोलीस पाटील अन् ग्रामसेवकावरही गुन्हा दाखल करण्याचे निर्देश

**■बीड। प्रतिनिधी,**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून कायम चर्चेत असलेल्या आणि गुन्हेगारी प्रकरणांनी गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी, महिला आयोगाने दखल घेतली आहे. बीड जिल्ह्यातील हिवरा पहाडी येथील महिला रात्री घरी झोपलेली असताना घरातून उचलून नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून रात्रभर गावच्या चावडीवर बांधून ठेवल्याची बातमी माध्यमातून समोर आली आहे. राज्य महिला आयोगाने याची दखल घेतली असून तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी प्रकरणाचे तपास अधिकारी अतुलकुमार लांडगे यांना दूरध्वनीवरून सूचना दिल्या आहेत. सद्यस्थितीत पीडित महिलेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम 137(2),333,64(2)(i) आणि पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी वैभव पटेकर याला अटक करण्यात आली आहे. या तपासा दरम्यान पीडित मुलीचा गेल्याच वर्षी बालविवाह लावून देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. या बालविवाहाच्या दृष्टीनेही गुन्हा दाखल करून लग्न लावून देणारे, लग्नास उपस्थित असणारे, पोलीस पाटील, ग्रामसेवक अशा संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देशही रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश आयोगाच्या अध्यक्षा अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी पोलीस प्रशासनाला दिले आहेत.

**नेमकं प्रकरण काय?**

10 मार्च रोजी रात्रीच्या सुमारास पीडित महिला आपल्या पतीसोबत घरी झोपलेली होती. मध्यरात्रीच्या सुमारास आरोपी घरात शिरला. त्याने महिलेचे तोंड दाबून तिला जबरदस्तीने घराबाहेर नेले. त्यानंतर तिला गावाजवळ असलल्या नदीपात्रात नेत तिच्यावर अत्याचार केला असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेनंतर आरोपीने पीडित महिलेला गावातील चावडीत आणून दोरीनं आणि कपड्यानं बांधून ठेवलं आणि तेथून पसार झाला. काही वेळानंतर शुद्धीवर आल्यानंतर पीडितेने मदतीसाठी आवाज दिला, मात्र सुरुवातीला तिला कोणीही मदत केली नाही. नंतर तिच्या नातेवाईकांना याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेत तिला तिथून सोडवून घरी नेलं. घटनेनंतर आरोपीच्या भीतीमुळे पीडितेने दोन दिवस हा प्रकार कोणालाही सांगितला नाही. मात्र, शेवटी तिने हिम्मत करून आई आणि मामासोबत पिंपळनेर पोलिस ठाण्यात जाऊन याबाबत तक्रार दाखल केली. त्यानंतर, आरोपी वैभव पटेकर यास अटक करण्यात आली असून 17 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

## सरकारी हॉस्टेलवर राहणाऱ्या तीन अल्पवयीन आदिवासी विद्यार्थिनी प्रेग्नंट, आरोपी कोण?

**दोन विद्यार्थिनी हॉस्टेलमध्ये राहत नव्हत्या**

काँग्रेस आमदारांनी असेही म्हटले की, ही घटना अनुसूचित क्षेत्रात घडली असून हे अत्यंत गंभीर प्रकरण आहे. सरकारी वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या विद्यार्थिनींची सुरक्षा कशी सुनिश्चित केली जात आहे, असा सवाल त्यांनी सरकारला केला. या प्रकरणात आरोपींविरुद्ध एफआयआर नोंदवून तपास करण्याऐवजी दोषींना वाचवण्याचा प्रयत्न केला गेला आणि विद्यार्थिनींना घरी पाठवून देण्यात आले, असा आरोप आमदारांनी केला. विधानसभेत करण्यात आलेल्या या आरोपांना राज्याचे शालेय शिक्षण मंत्री गजेंद्र यादव यांनी उत्तर दिले. त्यांनी माहिती दिली की, ज्या तीन विद्यार्थिनींचा उल्लेख केला जात आहे, त्यापैकी दोन विद्यार्थिनी गंगालूर येथील स्वामी आत्मानंद हिंदी माध्यम शाळेत शिकतात. या विद्यार्थिनी 11 वी आणि 12 वी इयत्तेतील असून त्या वसतिगृहात राहत नव्हत्या, तर आपल्या घरून दररोज शाळेत ये-जा करत होत्या.

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

एका आदिवासी विद्यार्थिनींच्या सरकारी हॉस्टेलमधील तीन अल्पवयीन विद्यार्थिनी गर्भवती राहिल्याने खळबळ उडाली आहे. माध्यमांनी हे प्रकरण लावून धरल्यानंतर याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने चौकशीचे आदेश जारी केले आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, याप्रकरणाच्या चौकशीसाठी चार सदस्यांची एक समिती गठित करण्यात आली आहे. छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यातील ही घटना आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, माध्यमांमध्ये आलेल्या बातम्यांनंतर चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. याविषयी विधानसभेत काँग्रेसच्या आमदारांनी भाजप सरकारला धारेवर धरले.

**'सात दिवसांच्या आत अहवाल द्या'**

या प्रकरणी चौकशीसाठी बनवण्यात आलेल्या समितीचे नेतृत्व अतिरिक्त जिल्हाधिकारी करणार आहेत. त्यांच्यासोबतच या समितीत आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त, बिजापूरचे जिल्हा शिक्षणाधिकारी आणि जिल्हा रुग्णालयातील सिव्हिल सर्जन यांचाही समावेश या समितीत असणार आहे. सात दिवसांच्या आत या प्रकरणाचा अहवाल देण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. या प्रकरणाने आता राजकीय वळण घेतले आहे. याचे पडसाद छत्तीसगडच्या विधानसभेत उमटलेले पहायला मिळाले. भाजप सरकार हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेसच्या आमदारांनी केला. हे प्रकरण बाहेर आल्यानंतर सरकारने या तिघी पीडित विद्यार्थिनींना घरी पाठवले आणि त्या हॉस्टेलवर रहात नसल्याचे सांगितले, असा दावाही काँग्रेसने केला आहे.





# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## परिणाम आता संपूर्ण जगाला भोगावे लागणार...




आखाती देशांतील इराणशी इस्रायल आणि अमेरिका यांचे युद्ध चालू होऊन १४ दिवस झाले आहेत. इराणचे प्रमुख धर्मगुरु अयातुल्ला खामेनी यांचा पहिल्याच दिवशी इस्रायल आणि अमेरिका यांनी केलेल्या संयुक्त सैन्य कारवाईत मृत्यू झाल्यामुळे 'युद्ध तेथेच थांबेल', असे वाटत होते; मात्र नंतर इराणने जी आक्रमणे इस्रायल, अमेरिकेचे सैन्य तळ आणि आखाती देश यांवर चालू केली आहेत, त्यामुळे हे युद्ध चिघळत आहे, असे लक्षात येते. इस्रायलला एकाच वेळी इराणची क्षेपणास्त्रे आणि हिजबुल्लाची आतंकवादी आक्रमणे यांच्याविरुद्ध लढावे लागत आहे. दुसरीकडे अमेरिकाही इराणच्या अनपेक्षित आक्रमणांमुळे त्रस्त झालेली दिसते. त्यामुळे तिने इराणच्या सर्वांत महत्त्वाच्या खर्ग बेटावर आक्रमण केले. इराणची सर्वाधिक, म्हणजे जवळजवळ ९० टक्के तेल निर्यात याच बेटावरून होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी या बेटावरील सैन्य तळांना लक्ष्य करून इराणची रसद तोडण्याचे धोरण अवलंबले आहे. 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' रोखण्याच्या इराणच्या धमकीला अमेरिकेने दिलेले हे प्रत्युत्तर असले, तरी याचे परिणाम आता संपूर्ण जगाला भोगावे लागणार आहेत. आखाती देशांमधील इराणचा अणू आणि आंतरखंडीय क्षेपणास्त्र यांचा कार्यक्रम बंद करण्यासह तेथे सत्तापालटाच्या मुख्य उद्देशाने चालू झालेले युद्ध आता वेगवेगळ्या वळणांवर जात आहे. इस्रायलने त्याचा महत्त्वाकांक्षी 'ग्रेटर इस्रायल' प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी लॅबेनॉनमध्ये प्रत्यक्ष भूमीवरील सैन्य कारवाई करण्याच्या हालचाली चालू केल्या आहेत, तर दुसरीकडे अमेरिकेने खर्ग बेटावर नियंत्रण मिळवण्यासाठी २५०० हून अधिक मरिन कमांडो, आक्रमण करणाया सैन्याच्या बोटी, विशेष लढाऊ नौका आणि विमाने यांच्यासह या बेटाच्या दिशेने कूच केले आहे. इस्रायलने हमासचे सहस्रो आतंकवादी आणि प्रमुख मारल्यामुळे ती संघटना कमकुवत झाली आहे. त्यामुळे वेस्ट बँकमध्ये काही पायाभूत सुविधा आणि वसाहती निर्माण करून तेथे नियंत्रण करण्याचा प्रयत्न चालू आहे. त्याचप्रमाणे आता हिजबुल्लाला संपवण्याच्या दृष्टीने लॅबेनॉनवर सैन्य कारवाई करणे या दृष्टीने तेथीलही भाग कह्यात घेण्यासाठी इस्रायल पुढे सरसावला आहे. १ लाखांहून अधिक सैन्य लॅबेनॉन सीमेवर तैनात आहे. यातून मोठी सैन्य कारवाई होणार आहे, हे निश्चित ! 'ग्रेटर इस्रायल' किंवा 'एरेट्झ इस्रायल' ही एक विस्तारवादी राजकीय आणि धार्मिक संकल्पना आहे. धार्मिक ग्रंथांमधील संदर्भांनुसार नाईल नदीपासून (इजिप्त) फरात नदीपर्यंतच्या (इराक) भूभागावर इस्रायलचा हक्क असावा, असा हा विचार आहे. यात सध्याचा इस्रायल, पॅलेस्टाईन, जॉर्डन, लॅबेनॉन, सीरिया आणि इजिप्त यांचा काही भाग येतो. याचाच अर्थ इस्रायलच्या दृष्टीने त्यांच्या देशाचा मूळ विस्तार या अनेक देशांमध्ये होता; मात्र तो नष्ट करण्यात आला. आता आखातातील युद्धाच्या निमित्ताने इस्रायलला त्याचे मूळ भौगोलिक स्वरूप प्राप्त करण्यासाठी ही संधी मिळाली आहे. इस्रायलमधील ज्यूंना जेव्हा ते या भागात वास्तव्याला आले, तेव्हा त्यांना स्थानिक अरबी मुसलमानांचा विरोध होता, हिटलरने त्यांचे शिरकाण मोठ्या प्रमाणात केले होते. तरी मातृभूमीसाठी ज्यू एकत्र आले, तेव्हा ६–७ अरब मुसलमान देशांनी एकत्र आक्रमण केले, तेव्हा इस्रायलने ते युद्ध केवळ जिंकलेच नाही, तर अरबांकडून इस्रायलसाठी अधिक भूभाग मिळवला. आता या युद्धाच्या निमित्ताने ज्यू देशासाठी अधिक भूमी आणि सुरक्षा यांसाठी इस्रायल प्रयत्नशील आहे. हिजबुल्लाचे आतंकवादी लॅबेनॉन येथूनच आतंकवादी कारवाया करत असल्याने त्या देशातील बहुतांश भाग कह्यात घेतला, तर आतंकवाद्यांचा तळच नष्ट होऊ शकतो, ही दूरदृष्टी आहे, म्हणजे स्वतःच्या देशाच्या सुरक्षेसाठी इस्रायल किती वेगाने मोठी पावले उचलत आहे, हे लक्षात येते. इराणसारख्या आकाराने आणि सैन्य क्षमतेने अनेक पटींनी मोठ्या देशाविरुद्ध युद्ध चालू ठेवणे, हमास अन् हुती यांच्याविरुद्ध लढणे, तसेच त्याच वेळी भूमीवरील एखादा भूभाग कह्यात घेण्यासाठी सैन्य कारवाई करणे यांतून इस्रायलचे सैन्यबळ आणि मनोबल अधोरेखित होते. दुसरीकडे इराणचे खर्ग बेट कह्यात घेण्याची अमेरिकेची कारवाई अनेकांना व्हेनेझुएलाप्रमाणे तेलाच्या साठ्यांवरील नियंत्रण आणि दादागिरी यांसाठी वाटते. रशिया आणि चीन यांच्यामुळे 'पेट्रोडॉलर'चे न्यून होत जाणारे महत्त्व आणि स्वतःचा महासत्ता असल्याचा दर्जा राखण्यासाठी तेलाने समृद्ध देशांतील तेलसाठे कह्यात घेऊन स्वतःच्या अखत्यारित त्यांचा व्यापार करण्याचे अमेरिकेचे गुप्त मनसुबे लपलेले नाहीत. शेवटी इराणमध्ये सत्तापालट केल्यानंतर स्वतःचे पूर्ण ऐकेल आणि कृती करील, अशाच व्यक्तींना अमेरिकेने प्रमुख केले असते अन् तेव्हा मुख्य भाग हा तेलावरील नियंत्रणाचेच सूत्र आग्रहाने मांडले असते. आता इराण बधत नाही म्हणून अमेरिका सैन्य कारवाई करत आहे, एवढाच काय तो वेगळा भाग आहे. कुणीतरी भाकीत केले होते की, तिसरे महायुद्ध आखाती देशात आणि तेही तेलावरून होईल. त्याचा आता प्रत्यय येत आहे. इराणने अमेरिकेला 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'तून व्यापारी नौका नेण्यासाठी तेलाचा व्यवहार चिनी चलन यूआनमध्ये करणार', असे ठणकावले आहे. त्यामुळे अमेरिका अधिक क्रुद्ध झाली असून आंतरराष्ट्रीय समुदायाला तिने 'हॉर्मुझच्या सामुद्रधुनी'च्या मुक्तीसाठी युद्धनौका पाठवण्याचे आवाहन केले आहे. या जागतिक पार्श्वभूमीतून भारतानेही धडा घेतला पाहिजे. भारताचा शत्रू पाक सध्या अफगाणिस्तानशी युद्धात गुंतला आहे. असे असूनही पाकव्याप्त काश्मीरमध्ये आतंकवादी कारवाया करणे आणि नवीन तळ उभारणे, ही कामे काही थांबलेली नाहीत. पाकव्याप्त काश्मीरमधील आतंकवाद्यांचे तळ भारतासाठी मोठी डोकेदुखी आहे. भारताने 'सर्जिकल स्ट्राईक' केल्यावर हे तळ तात्पुरते बंद झाले; मात्र पुन्हा चालू झाले. आतंकवादी भारतात कारवाया करून पाकव्याप्त काश्मीरमध्ये पळून जातात, म्हणजेच पाक त्यांना आश्रय देतो. भारताने हाती आलेल्या संधीचा उपयोग करून अनेक भारतीय आणि सैन्याधिकारी यांच्या मनातील पाकव्याप्त काश्मीर पुन्हा भारताला जोडण्याची इच्छा पूर्ण करावी. यामुळे भारतावरील आतंकवादी आक्रमणे अनेक पटींनी न्यून होतील, त्याचप्रमाणे काश्मीरचा प्रश्नही सुटेल. काश्मीर प्रश्नासाठी भारतातील सहस्रो जणांचे रक्त सांडले आहे, सैनिक आणि सैन्याधिकारी यांनी बलीदान दिले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर कुणीही दीड शहाणा उठतो आणि भारताला काश्मीर प्रश्नावर फुकाचे सल्ले देत बसतो. त्यामुळे भारताने आता शौर्य दाखवावे आणि पाकशी चालू असलेल्या छुप्या युद्धाच्या निमित्ताने पाकव्याप्त काश्मीर कह्यात घ्यावा, ही समस्या कायमस्वरूपी निकाली काढणे हितावह होईल.

## धर्मांतरविरोधी कायदा करण्याची वेळ का येते ?




भारतासारख्या धर्मनिरपेक्ष देशामध्ये आता महाराष्ट्र धरून आजवर 13 राज्यांनी धर्मांतरविरोधी कायदे केले आहेत. महाराष्ट्रात त्याला धर्मस्वातंत्र्य असे नाव देण्यात आले आहे. आपल्या देशाची राज्यघटना ही काही विशिष्ट धमार्ने प्रेरित नाही, ती सगळ्यांना सारखेच स्वातंत्र्य देते. आपण शाळेत असताना भारत माझा देश आहे, सारे भारतीय माझे बांधव आहेत, अशी प्रतिज्ञा घेत असतो. असे असेल तर मग देशात धर्मांतरविरोधी कायदे करण्याची वेळ का येते, यावर सगळ्यांनी सखोल आत्मचिंतन करायला हवे.

महाराष्ट्र हे भारतामध्ये पुरोगामी राज्य मानले जाते. कारण अनेक पुरोगामी चळवळींची सुरूवात महाराष्ट्रात झाली. त्यानंतर इतर राज्यांनी त्याचे अनुकरण केलेले दिसून येते. धर्मांतर आणि त्यातही सक्तीने धर्मांतर केले जात असेल आणि त्यातून सामाजिक शांतता बिघडत असेल तर त्याचा गांभीयार्ने विचार करण्याची गरज आहे. महाराष्ट्रात सक्तीच्या धर्मांतराला प्रतिबंध करणारे विधेयक विधानसभेत मंगळवारी मंजूर करण्यात आले. पुढे हे विधेयक विधान परिषदेत मंजूर झाले की, त्याचे कायद्यात रुपांतर होईल. पुरोगामी महाराष्ट्रात अशा प्रकारचा कायदा करण्याची वेळ येते, यामुळे त्याकडे जास्त लक्षपूर्वक आणि बारकाईने पाहण्याची गरज आहे. अशा प्रकारचा धर्मांतरविरोधी कायदा करणारे महाराष्ट्र 13 वे राज्य आहे. ओडिशा हे 1967 मध्ये धर्मांतरविरोधी कायदा करणारे पहिले राज्य आहे. मध्य प्रदेशमध्ये 1968 मध्ये हा कायदा लागू केला. अरुणाचल प्रदेशमध्ये 1978 पासून कायदा अस्तित्वात आहे. छत्तीसगडमध्ये 2000 मध्ये हा कायदा लागू झाला. गुजरातमध्ये 2003 मध्ये हा कायदा करण्यात आला. हिमाचल प्रदेशमध्ये 2006 मध्ये कायदा केला आणि 2019 मध्ये तो अधिक कडक करण्यात आला. झारखंडमध्ये 2017 मध्ये धर्मांतरविरोधी कायदा लागू केला. उत्तराखंडमध्ये 2018 मध्ये हा कायदा मंजूर झाला. उत्तर प्रदेशमध्ये 2020 मध्ये 'लव्ह जिहाद' विरोधात कडक कायदा लागू केला. कर्नाटकमध्ये 2022 मध्ये कायदा लागू झाला. हरियाणात 2022 मध्ये हा कायदा अंमलात आला. राजस्थानमध्ये 2025 मध्ये धर्मांतर बंदीचा नवा कायदा लागू करण्यात आला. आता महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम 2026 मंजूर केला आहे. या कायद्यानुसार, जबरदस्तीने किंवा फसवणुकीने केलेले धर्मांतर हा अजामीनपात्र गुन्हा ठरवण्यात आला असून दोषींना 7 वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे. म्हणजे अशा प्रकारच्या धर्मांतरविरोधी कायद्याची गरज १९६७ सालापासून प्रकषार्ने जाणवू लागली. त्यामुळेच ओडिशाने असा कायदा केला. म्हणजे त्याला आता ५९ वर्षे झाली आहेत. त्यानंतर विविध साली इतर १३ राज्यांनी हा कायदा लागू केला.

धर्म ही तसे पाहू गेल्यास प्रत्येकाची वैयक्तिक बाब आहे. कुणी कुठल्या धमार्चे अनुसरण करावे हा ज्याचा त्याचा विषय आहे. भारतात भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला त्याच्या पसंतीच्या धमार्चे अनुसरण करण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. भारतीय राज्यघटना ही पाकिस्तानसारखी एका विशिष्ट धमार्ला प्राधान्य देत नाही. पाकिस्तानची निर्मिती ही धर्माच्या आधारावर झालेली आहे. त्यामुळे ते एक इस्लामिक राष्ट्र आहे. त्यामुळे त्या देशात मुस्लिमेतर धर्माच्या लोकांना विशेष महत्त्व राहिले नाही. त्यांना धार्मिक छळाला सामोरे जावे लागले. त्यामुळे पाकिस्तानात आता मुस्लिमेतर लोकांची संख्या फारच कमी उरलेली आहे. पण भारतात तसे झाले नाही. भारतीय राज्यघटना ही धार्मिक आधारावर झालेली नाही. भारतात जरी हिंदू लोकांची संख्या जास्त असली तरी त्याचा राज्यघटनेवर कुठलाही प्रभाव पडणार नाही, याची घटनाकर्त्यांनी काळजी घेतली. म्हणजे मोठी संख्या असलेल्या धार्मियांकडून छोटी संख्या असलेल्या धर्मियांचे दमण होणार नाही. त्यांना अधिकारांपासून वंचित राहण्याची वेळ येणार नाही. इतकेच नव्हे तर भारतात जे धर्मीय संख्येने कमी आहेत, त्यांना अल्पसंख्याक दर्जा देऊन त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले आहे. धर्माच्या नावावर कुणावर अन्याय, अत्याचार झाला तर त्याविरोधात त्याला न्यायालयात दाद मागता येते. अगदी जातीवरून एखाद्याची छळवणूक, पिळवणूक होत असेल तर ॲट्रॉसिटी कायद्याखाली दोषींवर कारवाई करण्यात येते.

१९४७ साली भारत ब्रिटिशांच्या राजवटीतून मुक्त झाला. त्यानंतर राज्यघटना तयार करण्यात आली. पुढे राजकीय पक्षांच्या निवडणुका सुरू झाल्या. लोकांनी निवडून दिलेले सरकार सत्तेत येऊ लागले. भारतीय राजकारण घटनाकारांनी कितीही धर्मनिरपेक्ष बनविण्याचा प्रयत्न केला तरी निवडणुकीच्या राजकारणात मात्र निवडणूक लढवणाऱ्यांनी लोकांना आपल्याकडे खेचण्यासाठी जातीचा आणि धर्माचा वापर केला. त्यातूनच मग एखाद्या जातीच्या, धर्माच्या लोकांच्या विकासासाठी त्यांच्या जाती धमार्चा नेता निवडणूक लढवू लागला. त्याच्या जातीचे किंवा धमार्चे लोक त्याला निवडून देऊ लागले. कुठल्याही माणसाला तो लोकांसाठी काम करत असेल तर निवडून द्यायला हवे, त्याची जात किंवा धर्म बघून नव्हे, पण असे न होता आपल्या जातीच्या किंवा धर्माच्या माणसाला निवडून दिले तर तो आपला विकास करेल, अशी लोकांची भावना असल्यामुळे विशिष्ट जातीचे लोक त्याला निवडून देऊ लागले. त्यामुळेच जात आणि धर्म हे राजकारणाला चिकटले. त्यातूनच मग एकगठ्ठा मतांची संकल्पना पुढे आली. त्याची सुरुवात काँग्रेसने केली. कारण सुरुवातीला तोच पक्ष निवडणुकीच्या राजकारणात आघाडीवर होता. काँग्रेसने विकासाच्या नावावर मुस्लीम आणि दलितांची मतपेढी बनवली. म्हणजे प्रत्येक निवडणुकीत त्यांची एकगठ्ठा मते आपल्याला हमखास मिळतील, अशी सोय केली. पुढे दुसरा राष्ट्रीय पक्ष असलेल्या भाजपने काँग्रेसचाच कित्ता गिरवला. त्याचा केंद्रात आणि विविध राज्यांमध्ये सत्तेत येण्यास फायदा झाला. काँग्रेस सत्तेत येण्यासाठी मुस्लिमांच्या एकगठ्ठा मताचा वापर करत असेल तर आपणही तोच फॉर्म्युला हिंदूच्या एकगठ्ठा मतांसाठी का वापरू नये, असा विचार करून तो त्यांनी अयोध्येत राम मंदिर उभारण्याबाबत वापरला. त्यामुळे भाजप आणि मित्रपक्षांची सत्ता पहिल्यांदाच केंद्रात सत्तेत आली. भाजप हा हिंदुत्ववादी पक्ष असल्यामुळे निवडणुकांमध्ये मुस्लीम मतदार त्यांना मते देत नाहीत, हे भाजपच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी आपला सगळा जोर हा हिंदू एकगठ्ठा मतांकडे वळवला. त्यातून मग भाजपचे ज्येष्ठ नेते निवडणूक प्रचाराच्या काळात बटेंगे तो कटेंगेच्या घोषणा देऊन जास्तीत जास्त हिंदू आपल्याकडे वळतील, याची सोय करू लागले.

पहिल्यांदा काँग्रेस आणि नंतर त्याला उत्तर म्हणून भाजपने निवडणुकांमध्ये धार्मिक राजकारण सुरू केले. धर्मांतरविरोधी कायदे हे प्रामुख्याने भाजपशासित राज्यांमध्ये झालेले दिसतात. भाजपची सत्ता असलेले सरकार हा कायदा मंजूर करून घेते तर धर्माच्या आधारावर भाजप समाजामध्ये फूट पाडत आहे, असा आरोप काँग्रेस आणि समाजवादी, तसेच मुस्लिमांच्या पक्षांकडून करण्यात येतात. आताही जेव्हा महाराष्ट्राच्या विधानसभेत मंगळवारी धर्मस्वातंत्र्य विधेयक मंजूर झाले तेव्हा विरोधी बाकांवर असलेल्या काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि समाजवादी पाटीर्ने या विधेयकाला विरोध केला. या विधेयकावर बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, हे विधेयक कुठल्या विशिष्ट धर्माच्या विरोधात नाही, तर ते जबरदस्तीने होणाया धर्मांतराला प्रतिबंध करण्यासाठी आहे. धर्मांतराच्या मुद्द्यावर अनेकदा समाजात ताणतणाव निर्माण होतो, संघर्ष होतो. त्यावेळी प्रशासनाला आणि पोलिसांना योग्य ती कारवाई करणे सोयीचे व्हावे, म्हणून हा कायदा करण्यात आलेला आहे. हा कायदा सर्व धर्मियांना लागू आहे. म्हणजे कुठल्याही धर्मातील लोकांनी जबरदस्तीने इतरांचे धर्मांतर केले तर त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई केली जाईल. हा कायदा मुस्लीम धर्मियांवर अन्याय करणारा आहे, असे मत समाजवादी पार्टीच्या रईस शेख यांनी मांडले. त्यामुळे मुस्लीम समाजामध्ये अस्वस्थता पसरली आहे, असे त्यांचे म्हणणे होते.

विविध प्रकारची आमिषे दाखवून किंवा काही वेळा ब्लॅकमेलिंग करून, विवाहाचे वचन देऊन धर्मांतर केले जाते. आपली फसवणूक झाली आहे, हे धर्मांतरित माणसांच्या नंतर लक्षात येते. काहीवेळा धर्मांतरासाठी छळ होतो तर काही वेळा धर्मांतर केल्यानंतर धार्मिक कारणावरून छळ सुरू होता. त्यातून सुटका होणे अवघड होऊन बसते. अलीकडच्या काही वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात 'लव्ह जिहाद' होत असल्याचे आरोप होऊ लागले. म्हणजे एका धर्माच्या तरुणांनी दुसया धर्माच्या मुलींना प्रेमाच्या जाळ्यात गुंतवून विवाहाला भाग पाडणे आणि त्यानंतर धर्मांतर करणे किंवा धार्मिक कारणावरून छळ करणे. मुलींची अशा माध्यमातून फसवणूक करणे. पण लव्ह जिहाद अशी काही संकल्पनाच अस्तित्वात नाही, असे न्यायालयानेही म्हटले आहे. मुळात कुणी कुणाशी प्रेम करावे, विवाह करावा, याचे स्वातंत्र्य या देशातील प्रत्येक नागरिकाला राज्यघटनेने दिलेले आहे. पण या स्वातंत्र्याचा कुणी गैरफायदा घेत असेल तर त्याला प्रतिबंध करण्यासाठी हा कायदा आहे, असाच मुख्यमंत्र्यांचा सुर होता.

अशा प्रकारे धर्मांतरविरोधी कायदे विविध राज्यांमध्ये होत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत इतर धर्मात गेलेल्या हिंदूंना घरवापसीचे आवाहन करत आहेत. तसा विचार केला तर भारतीय उपखंडातील पारसी आणि ज्यू धर्मीय बाहेरून आलेले आहेत. बाकीचे लोक हे इथलेच आहेत. बहुतांश मुस्लीम, ख्रिस्ती हे धर्मांतरित आहेत. त्या धर्मांतराला विविध कारणे आहेत. काही वेळा बाहेरून आलेल्या आक्रमकांनी आपला धर्म इथल्या लोकांवर लादला. बाहेरून आलेल्या परधर्मियांची संख्या कमी होती. त्यामुळे बहुसंख्य लोक हे भारतीय मूळ वंशाचे आहेत. त्यांचा डीएनए सारखाच आहे, असा दावा मोहन भागवत यांनी केला होता. भारतात राहणाया विविध धर्मीय लोकांमध्ये अनेक समानता आहेत. ते एकमेकांच्या सण उत्सवात सहभागी होत असतात. एकमेकांसोबत खानपान करत असतात. असे सगळे असताना अशा प्रकारचे धर्मांतरविरोधी कायदे करून त्यासाठी कठोर कारवाई, तुरुंगवास, दंड अशा उपाययोजना कराव्या लागत असतील, तर ते सशक्त समाजाचे लक्षण नाही. कारण आपण भारतीय समाज म्हणून एका देशात राहतो, ते एकमेकांवर विश्वास ठेवून. असे कायदे समाजातील संघर्ष टाळण्यासाठी करावे लागत असतील, तर आपल्या देशातील सर्वधर्मियांनी त्यावर सखोल आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

## एका रांगेतून दुसऱ्या रांगेत हेच प्राक्तन...



नोटाबंदी, कोरोना महामारी आणि आता निर्माण झालेले गॅस संकट, या तीन वेगवेगळ्या प्रसंगांनी एक समान दृश्य वारंवार समोर आले ते म्हणजे प्रत्येकवेळी सामान्य नागरिकांना रांगेत उभे राहावे लागले.

भारतीय राजकारणात सत्तांतर नेहमीच मोठ्या आशा निर्माण करते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आले तेव्हा देशातील जनतेलाही अशाच मोठ्या अपेक्षा होत्या. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, निर्णायक नेतृत्व आणि वेगवान विकास यांची आश्वासने देत सत्तेत आलेल्या सरकारकडून सामान्य नागरिकांना स्थैर्य आणि सुबत्ता अपेक्षित होती. आधुनिक प्रचारतंत्र, सोशल मीडियाचा प्रभावी वापर आणि जनतेला भावणारी भाषणे या जोरावर मिळालेल्या बहुमतामुळे केंद्र सरकारकडे निर्णय घेण्याचे मोठे स्वातंत्र्य होते. परंतु गेल्या दशकात काही घटना अशा घडल्या की, ज्यांनी नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यावर थेट परिणाम केला. नोटाबंदी, कोरोना महामारी आणि आता निर्माण झालेले गॅस संकट, या तीन वेगवेगळ्या प्रसंगांनी एक समान दृश्य वारंवार समोर आले ते म्हणजे प्रत्येकवेळी सामान्य नागरिकांना रांगेत उभे राहावे लागले. कधी बँकांसमोर, कधी किराणा दुकानांसमोर आणि आता गॅस एजन्सीसमोर.

### पश्चिम आशियातील संघर्ष आणि त्याचा परिणाम

पश्चिम आशियात सुरू झालेल्या संघषार्ने जगातील ऊर्जा बाजारपेठ अस्थिर केली. खाडी देश हे जगातील सर्वात मोठे तेल आणि नैसर्गिक वायू उत्पादक आहेत. या प्रदेशातील युद्ध किंवा तणावाचा परिणाम जागतिक इंधन बाजारावर लगेच दिसून येतो. रिफायनरी, तेलवाहू जहाजे आणि महत्त्वाच्या सामुद्रधुनींवर हल्ले झाल्यास पुरवठा खंडित होतो. अलीकडील संघर्षातही असेच झाले. होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाची ऊर्जा वाहतूक मार्गांपैकी एक आहे. जगातील मोठा हिस्सा असलेले कच्चे तेल याच मार्गाने विविध देशांपर्यंत पोहोचते. या मार्गावरील तणाव वाढल्याने तेल आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला. परिणामी जागतिक बाजारात इंधन दर वाढू लागले. भारतासारख्या आयात आधारित देशाला याचा फटका बसणे अपरिहार्य आहे. देशातील मोठा ऊर्जा पुरवठा खाडी देशांवर अवलंबून आहे. त्यामुळे साहजिकच याचा भारतावर प्रतिकूल परिणाम झाला असून सर्वसामान्यांना याचे चटके बसू लागले आहेत.

### परराष्ट्र धोरण आणि ऊर्जा संतुलन

स्वातंत्र्यानंतर भारताने परराष्ट्र धोरणात 'अलिप्ततेची' भूमिका स्वीकारली होती. विविध शक्तींशी संतुलित संबंध ठेवत राष्ट्रीय हित जपणे हा त्या धोरणाचा गाभा होता. विशेषतः ऊर्जा पुरवठ्याच्या बाबतीत भारताने मध्यपूर्वेतील देशांशी दीर्घकालीन संबंध राखले. इराणसारखे देश भारतासाठी महत्त्वाचे ऊर्जा पुरवठादार राहिले आहेत. आर्थिक आणि राजनैतिक संबंधांमुळे ऊर्जा पुरवठ्यातील स्थैर्य टिकून राहिले. मात्र गेल्या काही वर्षांत जागतिक राजकारणातील बदलांमुळे या संतुलनावर परिणाम झाला. पश्चिम आशियातील संघर्ष तीव्र होत असताना भारताने कोणती भूमिका घ्यावी याबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले. जागतिक शक्तींच्या दबावाखाली किंवा बदलत्या राजनैतिक समीकरणांमुळे ऊर्जा पुरवठा व्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली, असे काही विश्लेषकांचे मत आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर काही काळ भारताकडे येणाऱ्या तेलवाहू जहाजांच्या हालचालींवरही परिणाम झाला. होर्मुझ सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांबाबत निर्माण झालेल्या अडचणींमुळे पुरवठा साखळीवर ताण आला.

### एलपीजी गॅस संकट

या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम देशांतर्गत बाजारात दिसू लागला. घरगुती गॅस सिलिंडरच्या किमतीत वाढ झाली. व्यावसायिक सिलिंडरच्या दरातही सरकारने वाढ केली आणि लगेचच नोंदणी आणि पुरवठा बंद केला. काही भागांत घरगुती वापराच्या गॅसचा पुरवठा कमी झाल्याच्या तक्रारी येऊ लागल्या. गॅस हा आज घराघरातील स्वयंपाकाचा मुख्य आधार आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील लाखो कुटुंबे स्वयंपाकासाठी एलपीजीवर अवलंबून आहेत. त्यामुळे सिलिंडर मिळण्यात अडचण निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होतो. काही शहरांमध्ये गॅस बुकिंग करताना अडथळे येऊ लागले. पुरवठा उशिरा होत असल्याने नागरिकांमध्ये अस्वस्थता वाढली. अनेक ठिकाणी गॅस एजन्सीजसमोर लोक सिलिंडर घेऊन रांगेत उभे असल्याचे दृश्य दिसू लागले. छोट्या शहरांपासून महानगरांपर्यंत हीच परिस्थिती दिसू लागल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

### उद्योग आणि व्यवसायांवरील परिणाम

गॅस संकटाचा फटका केवळ घरगुती वापरापुरता मर्यादित राहिला नाही. हॉटेल, रेस्टॉरंट, लघुउद्योग आणि विविध सेवा क्षेत्रांमध्ये एलपीजीचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. व्यावसायिक सिलिंडरच्या दरवाढीमुळे या क्षेत्रातील खर्च वाढला. बहुतांश ठिकाणी पुरवठा खंडित झाल्याने हॉटेल आणि खानावळी चालविणाऱ्यांना अडचणी निर्माण झाल्या. उद्योगधंद्यांमध्ये उत्पादन खर्च वाढल्याने त्याचा परिणाम ग्राहकांवरही झाला. आधीच महागाई आणि आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर हे संकट आले. त्यामुळे लहान व्यावसायिक आणि सेवा क्षेत्रातील कामगार यांच्यावर अतिरिक्त दबाव निर्माण झाला.

### रांगांचे प्रतीक

भारतीय समाजात 'रांग' हे एक प्रतीक बनले आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्था असो, रेल्वे तिकिटे असोत किंवा बँक व्यवहार रांग हा दैनंदिन अनुभव आहे. परंतु जेव्हा अत्यावश्यक सेवांसाठी मोठ्या प्रमाणावर रांगा लागतात तेव्हा त्या केवळ व्यवस्थापनातील अडचणींचे नव्हे तर व्यापक धोरणात्मक प्रश्नांचे प्रतीक ठरतात. नोटाबंदीच्या काळात लोकांना आपल्या पैशांसाठी बँकांसमोर रांगेत उभे राहावे लागले. लॉकडाऊनच्या काळात अन्नधान्य, जीवनाश्यक वस्तू, औषधांसाठी रांगा लागल्या आणि आता गॅस पुरवठ्याच्या अडचणींमुळे लोक पुन्हा सिलिंडर घेऊन एजन्सीसमोर रांगेत उभे राहिलेले दिसतात. या दृश्यांमधून एक प्रश्न उपस्थित होतो, प्रत्येक संकटाच्या वेळी सामान्य नागरिकांनाच का सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो ?

### ऊर्जा सुरक्षेचे महत्त्व

भारताच्या वाढत्या अर्थव्यवस्थेसाठी ऊर्जा सुरक्षा अत्यंत महत्त्वाची आहे. औद्योगिक विकास, वाहतूक व्यवस्था आणि घरगुती वापर या सर्व क्षेत्रांसाठी ऊर्जा पुरवठा स्थिर असणे आवश्यक आहे. यासाठी दीर्घकालीन धोरणांची आवश्यकता असते. विविध देशांमधून ऊर्जा आयात, पर्यायी ऊर्जास्रोतांचा विकास, साठवण व्यवस्था आणि पुरवठा साखळीची मजबुती या सर्व बाबींचा समन्वय आवश्यक असतो. पश्चिम आशियातील संघषार्सारख्या परिस्थितींसाठीही पूर्वतयारी असणे गरजेचे आहे. ऊर्जा आयातीचे विविधीकरण आणि राजनैतिक संतुलन राखणे हे या संदर्भात महत्त्वाचे ठरते.

### प्रशासनिक तयारी आणि संवाद

कोणतेही संकट निर्माण झाल्यावर प्रशासनाचा वेगवान प्रतिसाद आणि पारदर्शक संवाद अत्यंत महत्त्वाचा असतो. नागरिकांना स्पष्ट माहिती मिळाल्यास अस्वस्थता कमी होते. पुरवठा व्यवस्थेबाबत विश्वास निर्माण करणेही तितकेच आवश्यक असते. गॅस संकटाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना पुरवठ्याची खात्री देणे, वितरण व्यवस्थेतील अडथळे दूर करणे आणि पर्यायी उपाय शोधणे या गोष्टी तातडीने करणे आवश्यक आहे, पण दुर्दैवाने ते होताना दिसत नाही. त्याऐवजी सूत्रांच्या हवाल्याने वृत्तवाहिन्यांवरून खोट्या बातम्या पसरवून जनतेची फसवणूक केली जात आहे. जगातली तिसरी मोठी अर्थव्यवस्था झाल्याच्या गप्पा मारणारे सरकार आपल्या नागरिकांना एलपीजी सिलिंडरही देऊ शकत नाही ही देशाची सध्याची अवस्था आहे.

आज देशासमोर उभे असलेले गॅस संकट हे केवळ तात्पुरते इंधन संकट नाही; ते शासनशैली, परराष्ट्र धोरण आणि ऊर्जा व्यवस्थापन या सर्वांशी जोडलेले आहे. रांगा हे कोणत्याही समाजातील अस्थिरतेचे दृश्य प्रतीक असतात. जेव्हा नागरिकांना अत्यावश्यक सेवांसाठी वारंवार रांगेत उभे राहावे लागते, तेव्हा त्या मागील धोरणात्मक प्रश्नांकडे लक्ष देणे आवश्यक ठरते. भारतातील लोकशाहीची ताकद ही तिच्या जनतेत आहे. त्यामुळे शासनाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा केंद्रबिंदू नागरिकांचे जीवन सुलभ करणे हाच असला पाहिजे. ऊर्जा सुरक्षा, प्रशासनिक तयारी आणि संतुलित परराष्ट्र धोरण यांचा योग्य मेळ घालूनच अशा संकटांना तोंड देता येईल. अन्यथा देशाला पुन्हा पुन्हा अशा परिस्थितीला सामोरे जावे लागू शकते जिथे नागरिकांना एका रांगेतून दुसऱ्या रांगेत उभे राहण्याची वेळ येते.

## केंद्र सरकारची वांग'चूक'!



सोनम वांगचुक यांच्या अटकेपासून ते त्यांच्या सुटकेपर्यंत राष्ट्रीय पातळीवर जी चर्चा झाली त्यामध्ये राजकीय समाजमन ढवळून निघाले आहे. वांगचुक यांच्या अटकेचे समर्थन आणि विरोध अशा दोन्ही बाजू या निमित्ताने समोर आल्या. यातील अटकेला विरोध करणारे सामाजिक लढ्याचे शिलेदार आहेत तर त्यांच्या अटकेचे समर्थन करणारे राजकीय सत्तेचे प्रतिनिधीत्व करणारे आहेत. त्यामुळे वांगचुक यांच्या आंदोलनाचा विषय हा थेट समाजकारणाविरोधातील राजकारण असाच राहिला आहे. जवळपास सहा महिन्यांपूर्वी लेहमध्ये झालेल्या हिंसाचाराचे कारण देऊन वांगचुक यांना अटक झाली. त्यांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यान्वये अटक करण्यात आली होती. या कायद्यातील क्लिष्टता समजून घेणे गरजेचे आहे. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा विषय हा घटनात्मक लोकशाहीला पूरक आहे का, देशातील सत्तेला साजेसा आहे का? हा मुद्दा इथे महत्वाचा आहे. राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे म्हणजे नक्की काय? अशी सुरक्षा म्हणजे राष्ट्रातील नागरिकांची, त्यांच्या मालमत्तेची सुरक्षा असा घेतल्यास वांगचुक यांच्या आंदोलनाने हा घटक खरंच धोक्यात आला होता का? जर तो धोक्यात आला असला तर ते सिद्ध करण्यासाठी सत्तेकडे पुरेसे पुरावे होते का?, किंबहुना राष्ट्रीय सुरक्षा कायद्यातील त्रुटींचा आधार घेऊन सत्तेकडून त्याचा राजकीय हत्यार म्हणून लोकभावनेविरोधात वापर करण्यात आला का? राष्ट्रीय सुरक्षा कायद्यातील गुन्हा सिद्ध करण्यासाठीच्या कायदेशीर तरतुदींच्या अधिकारापासून वांगचुक यांना वंचित ठेवण्यात आले का? आदी अनेक प्रश्न वांगचुक यांच्या सुटकेनंतर उपस्थित झाले आहेत.

# आता पेट्रोल पंपांवर मिळणार रॉकेल

## अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची माहिती

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राज्यात घरगुती गॅसच्या टंचाईमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी, राज्य सरकारकडून बाजारात मोठ्या प्रमाणावर रॉकेल उपलब्ध करून देण्याची योजना आखण्यात आली आहे. त्यानुसार लवकरच पेट्रोल पंपांवर रॉकेल उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात निवेदनाद्वारे दिली. तसेच घरगुती गॅस पुरवठ्याबाबत नागरिकांनी काळजी करू नये, असे आवाहनही त्यांनी केले.

सध्या इराण-इस्रायल आणि अमेरिका युद्धामुळे राज्यात घरगुती गॅससह इंधनाचा तुटवडा जाणवू लागला आहे. घरगुती गॅस केंद्रांसमोर नागरिकांच्या रांगा लागल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर भुजबळ यांनी सोमवारी विधिमंडळात निवेदन केले. ''एलपीजी उत्पादनातील अडचणी दूर करण्याचे कामही सुरू असून सध्याच्या परिस्थितीत घरगुती गॅसच्या उत्पादनाला सर्वाधिक प्राधान्य दिले जात आहे. तसेच उपलब्ध गॅसमधून






रुग्णालये, शैक्षणिक संस्था, वृद्धाश्रम आणि स्मशानभूमींना एलपीजी पुरवठ्यात १०० टक्के प्राधान्य देण्यात येणार आहे. औषध, उद्योग आणि संरक्षण क्षेत्रातील उपहारगृहांना एलपीजी वितरणात ५० टक्के प्राधान्य दिले जाईल,'' अशी माहिती भुजबळ यांनी दिली.

''राज्यात सध्या केरोसिनचा पुरेसा साठा आहे. उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना रॉकेल देण्यासंदर्भात न्यायालयाने यापूर्वी निर्बंध घातले होते. मात्र, सद्यस्थिती लक्षात घेता, सर्वांना रॉकेल उपलब्ध करून देण्याबाबत न्यायालयाला कळविण्यात आले आहे. त्यामुळे रॉकेलचे वितरकांमार्फत वितरण करता येईल. मात्र पूर्वी रॉकेल बंद झाल्यामुळे वितरकांची साखळी खंडित झाली आहे. त्यामुळे सुरुवातीला बीपीसीएल, एचपीसीएल आणि आयओसीएलच्या पेट्रोल पंपांवर रॉकेल उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,'' असेही भुजबळ यांनी स्पष्ट केले.

### साठेबाजी रोखण्यासाठी विशेष समित्यांची नियुक्ती

गॅस पुरवठ्याबाबत केंद्र सरकारशी सातत्याने संपर्क ठेवण्यात येत आहे. एलपीजीचा प्रश्न हा केंद्र सरकारच्या अखत्यारित येतो. केंद्राकडून एलपीजीचा पुरेसा साठा असल्याचे सांगण्यात आले असून रांगा, काळाबाजार किंवा साठेबाजी रोखण्यासाठी विशेष समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आतापर्यंतच्या कारवाईत १ हजार २०८ गॅस सिलिंडर आणि सुमारे ३३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती छगन भुजबळ यांनी यावेळी दिली.

# पालघर जिल्ह्यात गॅसचा पुरेसा साठा

## जिल्हा पुरवठा विभागाची माहिती



■पालघर। प्रतिनिधी,

मध्य पूर्व आशिया, अमेरिका व युरोपियन खंडात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पालघर जिल्ह्यातील नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच गॅस एजन्सींवर अनावश्यक गर्दी करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. जिल्ह्यात एलपीजी गॅस सिलेंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी घाबरून जाऊन गॅस साठवण्याचा प्रयत्न करू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

जिल्हा पुरवठा विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, घरगुती वापरासाठी दिला जाणारा एलपीजी गॅस केवळ घरगुती कारणांसाठीच वापरणे बंधनकारक आहे. काही ठिकाणी घरगुती गॅसचा व्यावसायिक किंवा अन्य अनधिकृत वापर होत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्ती अथवा संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व गॅस वितरकांना बुकिंगनंतर निश्चित मुदतीत ग्राहकांना गॅस सिलेंडरची डिलिव्हरी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गॅस वितरणासंदर्भात कोणतीही अडचण निर्माण झाल्यास नागरिकांनी आपल्या तालुक्यातील संबंधित अधिकार्‍यांशी संपर्क साधावा, असे प्रशासनाने सांगितले आहे. तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी सिमा महल्ले यांच्याकडून नागरिकांना अफवांपासून दूर राहून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक'

## विधानपरिषदेत मंजूर



■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रात गेल्या काही काळापासून चर्चेत असलेले आणि अत्यंत कडक तरतुदी असलेले ह्यमहाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ह्ण आता विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर झाले आहे. सोमवारी रात्री विधानसभेत या विधेयकाला मंजुरी मिळाल्यानंतर, आज मंगळवारी विधान परिषदेतही त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. प्रलोभन, धाक-दपटशहा किंवा विवाहाचे आमिष दाखवून होणाऱ्या बेकायदेशीर धर्मांतरणाला पायबंद घालणे, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे.

### संस्थांवर टाच आणि तपासाचे स्वरूप

केवळ व्यक्तीच नव्हे, तर धर्मांतरासाठी प्रोत्साहन देणाऱ्या संस्थांवरही सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. दुसऱ्या धर्माचा अपमान करून स्वतःच्या धमार्चे उदात्तीकरण करणे किंवा 'दैवी प्रकोपाची' भीती दाखवणे हा आता गुन्हा ठरेल. दोषी आढळणाऱ्या संस्थांची नोंदणी रद्द केली जाईल आणि त्यांचे सरकारी अनुदान कायमचे बंद करण्यात येईल. या प्रकरणांचा तपास किमान पोलीस उपनिरीक्षक दर्जाचा अधिकारी करेल आणि याची सुनावणी थेट सत्र न्यायालयात होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, धर्मांतर बळजबरीने झालेले नाही, हे सिद्ध करण्याची कायदेशीर जबाबदारी आता आरोपीवर सोपवण्यात आली आहे.

आज विधान परिषदेत 'महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६' वर चर्चा होताना सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी या कायद्याच्या आवश्यकतेवर भर दिला, तर विरोधकांनी काही तांत्रिक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले.

### बळजबरीच्या धर्मांतरासाठी कठोर दंड आणि शिक्षा

या नवीन कायद्यानुसार, कोणत्याही व्यक्तीला फसवून किंवा 'दैवी चमत्कारांचा' बनाव रचून धर्मांतरित केल्यास संबंधितांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीमधील असेल, तर किमान ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल. विशेष म्हणजे, गुन्ह्याची पुनरावृत्ती करणाऱ्यांना थेट १० वर्षांच्या कठोर शिक्षेला सामोरे जावे लागेल.

### विवाह आणि धर्मांतरः महत्त्वाचे नियम

या कायद्यातील सर्वात महत्त्वाची तरतूद म्हणजे, केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह आता 'अवैध' ठरवण्यात येणार आहेत. मात्र, अशा विवादास्पद विवाहातून जन्माला आलेल्या बालकांचे हित जपण्यासाठी त्यांना आई-वडिलांच्या मालमत्तेत पूर्ण अधिकार देण्यात आले आहेत, तसेच अशा मुलांची कस्टडी आईकडेच राहील असे स्पष्ट करण्यात आले आहे. जर एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या इच्छेने (स्वेच्छेने) धर्म बदलायचा असेल, तर त्याला ६० दिवस आधी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना तशी रीतसर नोटीस देणे बंधनकारक असेल.

### ''हा कायदा कोणत्याही धर्माच्या विरोधात नाही'' : गृहराज्यमंत्री पंकज भोयर

विधेयक मांडताना गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, ''हे विधेयक कोणत्याही विशिष्ट धर्माच्या विरोधात नसून, केवळ फसवणूक, भीती आणि प्रलोभनाद्वारे होणाऱ्या 'सक्तीच्या' धर्मांतराला चाप लावण्यासाठी आहे. ज्यांना खरोखर स्वेच्छेने धर्मांतर करायचे आहे, त्यांच्यासाठी ६० दिवस आधी नोटीस देण्याची तरतूद करण्यात आली आहे, ज्यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता येईल. मात्र, महिला आणि अल्पवयीन मुलांच्या बाबतीत जे गुन्हे घडतील, त्यामध्ये दोषींना कोणत्याही प्रकारची सवलत दिली जाणार नाही,'' असे त्यांनी सभागृहात ठणकावून सांगितले.

### ''फसवणूक होणाऱ्या मुलींसाठी हा कायदा ढाल ठरेल'' : चित्रा वाघ

महिलांच्या हक्कासाठी सातत्याने आवाज उठवणाऱ्या चित्रा वाघ यांनी या विधेयकाचे जोरदार स्वागत केले. ''विवाहाचे आमिष दाखवून किंवा स्वतःचे नाव बदलून हिंदू मुलींची जी फसवणूक केली जाते, ती आता थांबेल. अनेक मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे सक्तीने धर्मांतर केले जाते, त्यांच्यासाठी हा कायदा एक संरक्षक ढाल ठरेल,'' असे त्या म्हणाल्या. तसेच, अशा विवादास्पद विवाहातून जन्मलेल्या मुलांच्या कस्टडीचा अधिकार आईला देणे आणि त्यांना वडिलांच्या मालमत्तेत हक्क देणे, हा महिलांना न्याय देणारा क्रांतीकारी निर्णय असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### ''संस्थांच्या माध्यमातून चालणाऱ्या धर्मांतरावर वचक'' : प्रसाद लाड

प्रसाद लाड यांनी प्रामुख्याने धर्मांतरासाठी वापरल्या जाणाऱ्या आर्थिक प्रलोभनांवर भाष्य केले. ते म्हणाले की, ''काही संस्था परकीय निधीचा गैरवापर करून गरीब आणि गरजू नागरिकांना पैसे किंवा मोफत शिक्षणाचे आमिष दाखवतात. अशा संस्थांची नोंदणी रद्द करून त्यांचे सरकारी अनुदान बंद करण्याची तरतूद करून सरकारने योग्य पाऊल उचलले आहे. धर्माचा अपमान करून किंवा 'दैवी प्रकोप' होईल अशी भीती घालून लोकांचे मन वळवणे, हा गंभीर गुन्हाच मानला जावा,'' अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

# वसई-विरारमधील २६ हजार ७०० चौ.फुट अनधिकृत बांधकाम निष्कासित



■विरार। प्रतिनिधी,

वसई- विरार शहरात गेल्या काही अनेक दिवसांपासून अनधिकृत बांधकाम वाढू लागले आहे. याच बांधकामाच्या विरोधात पालिकेने तोडक कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे. या कारवाईत सोमवारी २६ हजार ७०० चौ.फुट अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

वसई-विरार शहर महानगर पालिकेचे आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त दिपक सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली १६ मार्च -रोजी वसई -विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'जी' वालीव व प्रभाग समिती 'एफ' पेल्हार मार्फत संयुक्त कारवाई करून अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले आहे.या कारवाई वेळी प्रभाग समिती 'जी' चे सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे, अतिक्रमण विभाग प्रमुख मनोज घरत, लिपिक प्रमोद बर्वे, क.अभियंता मयुरेश पाटील व जितेश पाटील, सुरक्षा कर्मचारी व मजूर कर्मचारी उपस्थित होते.

कारवाईत प्रभाग समिती 'जी' वालीव अंतर्गत सातिवली-तुंगारेश्वर परिसरातील २१ हजार चौ.फुटाचे २५८ पत्राशेडचे अनधिकृत बांधकाम निष्कासीत करण्यात आले. तसेच ५ हजार ७०० चौ.फुटाचे ५७ बांबूशेड, ४६ हातगाड्या व ३२ टर्पया निष्कासीत करून सदरील परिसर मोकळा करण्यात आला.

# नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेला इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता

■मुंबई। प्रतिनिधी,

विदर्भातील नवउद्योग (स्टार्टअप) परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी त्यांच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरसाठी दोन दिवसीय धोरणात्मक कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत राज्यभरातील इन्क्यूबेशन सेंटर प्रमुख, शैक्षणिक संस्था तसेच परिसंस्थेतील विविध घटक सहभागी झाले.



या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. यामुळे भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर यांना अधिकृतपणे महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली. या धोरणात्मक समावेशामुळे विदर्भातील नवोपक्रम, उद्योजकता आणि नवउद्योगांच्या वाढीस मोठी चालना मिळणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात मजबूत व सर्वसमावेशक नवउद्योग परिसंस्था उभारण्याबाबत शासनाची कटिबद्धता अधोरेखित केली. अशा संस्थात्मक सहकार्यामुळे नवउद्योगांना योग्य मार्गदर्शन, साहाय्य व संधी उपलब्ध होऊन प्रादेशिक विकासास हातभार लागेल, असे त्यांनी नमूद केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी प्रारंभिक टप्प्यातील नवोपक्रमकर्त्यांना साहाय्य देण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढ महत्त्वाची असल्याचे सांगितले. जिल्हा व स्थानिक पातळीवर नवोपक्रम विकसित करण्यासाठी सक्षम इन्क्यूबेशन प्रणाली आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, राज्यात २९ सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरचे मजबूत जाळे उभे करण्यात आले असून ते नवउद्योगांना कल्पनांपासून विस्तारक्षम उपक्रमांपर्यंत पोहोचण्यास मदत करत आहेत. तसेच इन्क्यूबेशन सेंटरनी परस्पर ज्ञान, कौशल्य व संधींची देवाणघेवाण करत सहकार्यपूर्ण परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या कार्यशाळेत इन्क्यूबेशन पद्धती अधिक सक्षम करण्याबरोबरच दीर्घकालीन शाश्वततेवरही भर देण्यात आला. अटल नाविन्यता मिशनचे माजी संचालक आणि नीति आयोगाचे अतिरिक्त सचिव रमणन रमणाथन, आयएसबीएचे अध्यक्ष प्रसाद मेमन यांच्या सत्रांमध्ये इन्क्यूबेशन सेंटरची आर्थिक, कार्यात्मक व धोरणात्मक शाश्वतता सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या इन्क्यूबेशन केंद्रामध्ये नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचा समावेश झाल्यामुळे विदभार्तील नवउद्योजकांना मार्गदर्शन, उद्योगसाखळीशी जोडणी आणि नवोपक्रम साहाय्य अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे इच्छुक उद्योजकांसाठी नव्या संधी निर्माण होऊन महाराष्ट्राची देशातील अग्रगण्य नवउद्योग केंद्र म्हणून ओळख अधिक बळकट होणार आहे.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर 'रत्नागिरीचा राजा' शहरात दाखल... हापूसच्या आगमनाने बाजारात सुगंध, दर मात्र दुपटीने वाढले

■जुन्नर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजीनगर : गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर कोकणातील प्रसिद्ध हापूस आंब्याचे शहरात आगमन झाले असून आंबाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. रत्नागिरी आणि देवगड परिसरातील हापूस आंब्याच्या पेट्या छत्रपती संभाजीनगरच्या घाऊक बाजारात दाखल होऊ लागल्या आहेत. मात्र यंदा बाजारात आवक कमी असल्याने दर जवळपास दुपटीने वाढल्याची माहिती आंबा विक्रेत्यांनी दिली.



उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारात विविध प्रकारची हंगामी फळे येण्यास सुरुवात होते. त्यामध्ये 'फळांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा हापूस आंबा ग्राहकांची सर्वाधिक पसंती मिळवतो. दरवर्षीप्रमाणे यंदाही बाजारात हापूस आंब्याची विक्री सुरू झाली असून शहरातील विविध भागांत आंब्यांची दुकाने सजू लागली आहेत. विशेषतः रत्नागिरी आणि देवगड परिसरातील दर्जेदार हापूस आंब्याला ग्राहकांकडून मोठी मागणी आहे. सध्या बाजारात हापूस आंब्याचे दर सुमारे १५०० रुपये डझन इतके असून मागील वर्षी हेच आंबे ७०० ते ७५० रुपये डझन दराने विकले जात होते. त्यामुळे दर जास्त असले तरी दर्जेदार देवगड व रत्नागिरी हापूस खरेदीसाठी ग्राहकांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे. हापूस आंब्याच्या आगमनामुळे छत्रपती संभाजीनगरच्या बाजारात पुन्हा एकदा आंब्याचा दरवळ जाणवू लागला आहे. दर जास्त असले तरी पहिल्या हापूसची चव घेण्यासाठी अनेक ग्राहक बाजारात गर्दी करताना दिसत आहेत.

### आवक वाढल्यावर दर कमी होण्याची शक्यता

कोकणातील बागांमध्ये आता हळूहळू आंबा काढणीला सुरुवात होत आहे. पुढील १० ते १५ दिवसांत बाजारात मोठ्या प्रमाणात आवक वाढेल, अशी अपेक्षा व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. आवक वाढल्यानंतर दर काही प्रमाणात स्थिर होण्याची शक्यता आहे.

### पंधरा दिवस उशिरा सुरू झाला सिजन

यंदा कोकण पट्ट्यात बदलते हवामान, काही ठिकाणी झालेला अवेळी पाऊस आणि थंडीचा वाढलेला कालावधी यामुळे आंब्याची मोहोर व फळधारणा उशिरा झाली. त्यामुळे दरवर्षी फेब्रुवारीच्या अखेरीस सुरू होणारी आवक यंदा मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात सुरू झाली आहे. परिणामी शहरात हापूस आंब्याचे आगमन सुमारे पंधरा दिवस उशिरा झाले असल्याचे व्यापारी राजू आंबेवाले यांनी सांगितले.

# नवी मुंबईत १३.९१ कोटींचा मुद्रांक शुल्क घोटाळा...

## दुय्यम निबंधकासह एजंटवर गुन्हा दाखल

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींमधील १४१ दस्तांची बेकायदेशीर नोंदणी करून शासनाचा तब्बल १३ कोटी ९१ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्रांक शुल्क (स्टॅम्प ड्यूटी) महसूल बुडवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी तुर्भे पोलिसांनी कोपरखैरणे येथील कार्यालयातील तत्कालीन प्रभारी सह दुय्यम निबंधकासह दस्त नोंदणी एजंट व इतरांवर सरकारी पदाचा गैरवापर करून शासनाची व जनतेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या मोठ्या घोटाळ्यामुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.




कोपरखैरणे येथील सहदुय्यम निबंधक, सहकारी संस्था (सिडको) कार्यालयात सप्टेंबर २०२४ ते जुलै २०२५ या कालावधीत प्रभारी सह दुय्यम निबंधक म्हणून राजकुमार दहिफळे कार्यरत होते. या काळात दहिफळे यांनी दस्त नोंदणी एजंट योगेश चव्हाण व इतरांच्या संगनमताने अनधिकृत इमारतींमधील दस्तांची बेकायदेशीर नोंदणी करून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. या संदर्भात तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ठाणे येथील जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था कार्यालयाने संबंधित दस्त नोंदणी कागदपत्रांची तपासणी केली.

तपासणीदरम्यान तत्कालीन प्रभारी सह दुय्यम निबंधक राजकुमार दहिफळे यांनी भारतीय नोंदणी अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करून सिडको क्षेत्रातील अनधिकृत इमारतींमधील १४१ दस्तांची बेकायदेशीर नोंदणी केल्याचे आढळून आले. या नोंदणीदरम्यान जाणूनबुजून कमी मुद्रांक शुल्क आकारण्यात आल्याने महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाचे १३ कोटी ९१ लाखांहून अधिक नुकसान झाल्याचे चौकशीत स्पष्ट झाले.

या प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनाकडे पाठविण्यात आल्यानंतर दोषींवर कारवाईचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार ठाणे येथील प्रभारी सह दुय्यम निबंधक ज्योती राऊत यांनी बुधवारी तुर्भे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी या प्रकरणी तत्कालीन प्रभारी सहदुय्यम निबंधक राजकुमार दहिफळे, एजंट योगेश चव्हाण व इतरांविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेअर ट्रेडिंगच्या आमिषाने ९७ लाखांची फसवणूक

## चार आरोपी अटकेत... ४०० हून अधिक व्हिलांमध्ये शोधमोहीम

■पुणे। प्रतिनिधी,

लोणावळा परिसरातील व्हिला व गेस्ट हाऊसमध्ये थांबून सायबर फसवणूक करणाऱ्या टोळीचा पदार्फाश करत पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून तब्बल ९७ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केल्याच्या गुन्ह्यात ही कारवाई करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मोनिल अतुलकुमार मोदी (२४), रवी गोकल प्रसाद जाट (२१), रुद्रपाल सिंग गजेंद्रसिंग चौहान (२२) आणि हंश कैलास वर्मा (१९) अशी आहेत. या प्रकरणात यापूर्वी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून ते न्यायालयीन कोठडीत आहेत. दरम्यान, फसवणुकीतील १८ लाख रुपये पोलिसांनी हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. तपासात आरोपींनी येस बँकेतील एका करंट अकाऊंटमध्ये ८ लाख २५ हजार रुपये जमा




करून घेतल्याचे उघड झाले. संबंधित खाते 'वेल्टोरा टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड' या नावाने उघडण्यात आले होते. या खात्याचा धारक मोनिल मोदी हा सतत वेगवेगळ्या राज्यांत फिरत असल्याने त्याचा शोध घेणे पोलिसांसाठी आव्हानात्मक ठरत होते.

दरम्यान, आरोपी लोणावळ्यात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक रवाना करण्यात आले.

### लोणावळा परिसरात शोधमोहीम सुरू

लोणावळा परिसरातील सुमारे ४०० ते ५०० व्हिलांमध्ये शोधमोहीम राबवून अखेर मुख्य आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्यासोबत आणखी तीन जण आढळून आले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून लॅपटॉप, ७ मोबाईल फोन, १४ डेबिट कार्ड, वेब कॅमेरे, बँक अकाऊंट किट आणि रबरी स्टॅम्प असा मुद्देमाल जप्त केला.

### खात्यात एक कोटींहून अधिक रक्कम

तपासादरम्यान आरोपी उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँकेच्या खात्यात सायबर फसवणुकीची रक्कम वर्ग करत असल्याचे समोर आले. या खात्यात एक कोटी रुपयांहून अधिक रक्कम जमा झाल्याचेही उघड झाले आहे. आरोपींनी विविध बँकांमध्ये अनेक करंट अकाऊंट उघडून देशभरात अशाच प्रकारे फसवणूक केल्याची कबुली दिली आहे. या टोळीवर हाँगकाँगमधून वेब कॅमेऱ्याद्वारे नियंत्रण ठेवले जात असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपींना यूएसडीटी (वरऊ) क्रिप्टोकरन्सीद्वारे मोबदला दिला जात होता. सर्व आरोपी सुशिक्षित असून त्यांना बनावट नोकरीचे आमिष दाखवून या गुन्ह्यात ओढले गेले असल्याचेही समोर आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com